प्रसिद्ध करण्यायोग्य

(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

भारताच्या माननीय सर्वोच्च न्यायालया समक्ष.

मूळ दिवाणी अधिकारिता

रिट याचिका (दिवाणी) क्र. ७३/२०१५

मानव अधिकाराकरिता सामाजिक कृती मंच आणि इतर ...... याचिकाकर्ते

-// विरुद्ध //-

युनियन ऑफ इंडिया
विधी आणि न्याय मंत्रालय आणि इतर ...... प्रतिवादी

सोबत

अपील क्रमांक १२६५/२०१७

रीट याचिका (फौजदारी) क्रमांक १५६/२०१७

न्या य नि र्ण य

दीपक मिश्रा, भारताचे सरन्यायाधीश

कायद्याचा, विशेषत: फौजदारी कायद्याचा, हळूहळू समाजाच्या कण्यात प्रवेश करणारी आणि समाजातील मोठ्या वर्गाच्या मज्जातंतूंना क्षीण करणारी व्याधी, जरी पूर्णपणे काढून टाकता आली नाही तरी तिला नियंत्रित करण्याचा त्याचा मानस आहे. जेव्हा अशी परिस्थिती उद्भवते तेव्हा कायदेमंडळ आपली चिंता आणि जबाबदारी व्यक्त करून, अपेक्षित परिणाम साध्य करण्याच्या उद्देशाने नवीन दंडात्मक तरतूद करते. जेव्हा संवेदनात्मक कायदेशीर तरतूद कायद्याच्या पुस्तकात आणली जाते, तेव्हा गुन्ह्यातील पिडीतांना पुरेसे सुरक्षित वाटते आणि जर ती तरतूद वैवाहिक क्षेत्राशी संबंधित असेल तर दोन्ही पक्ष, म्हणजे पत्नी आणि पती किंवा जेव्हा पतीच्या पक्षात कोणावरही गुन्हा दाखल

केला जातो तेव्हा आणि दोन्ही पक्ष पीडित असल्याचा दावा करतात. आरोपी व्यक्ती, स्वतः पिडीत आहोत असे म्हणणे मांडताना, गंभीर चिंता व्यक्त करतात आणि चळवणुकीच्या परिस्थितीच्या प्रचंड आणि तीव्र चिंतेवर भर देऊन ते जोमाने व्यक्त करतात. कायद्याच्या न्यायालयात असे प्रतिपादन केले जाते की दंडात्मक तरतुदीचा अकल्पनीय मर्यादेपर्यंत गैरवापर केला जातो, ते अश्या प्रकारे की क्रूर, निर्दयी आणि पूर्णपणे सूडबुद्धीने, तरुण, वृद्ध आणि दूरच्या ठिकाणी राहणारे नातेवाईक ज्यांचा या घटनेशी काहीही संबंध नसला तरी त्यांना त्यात गोवले जाते. त्यामुळे दंडात्मक तरतुदीचा दुरुपयोग उभ्या रेषेत म्हणजे अतिशय वेगाने वाढला आहे. जेव्हा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेद्वारे कायद्याच्या अंमलबजावणीचा गैरवापर केला जातो, तेव्हा विधिमंडळ अटकेच्या संदर्भात संरक्षणात्मक तरतूद सादर करते. हे सांगण्याची गरज नाही की, न्यायालयांना आगाऊ जामीन किंवा सर्वतोमुखी अटकपूर्व जामीन मंजूर करण्याचा आणि कायदेशीर संतुलन स्थिर करण्यासाठी फौजदारी कार्यवाही पूर्णपणे रद्दबातल करण्याचा पुरेसा अधिकार आहे कोणतेही न्यायालय दोन लिंगांमधील युद्धाची दूरस्थपणे कल्पना करत नाही. न्यायालये या परिस्थितीत सतत जागृत राहतात की जरी कोणतेही युद्ध झाले नाही, तरीही पिडीत वर्गाचा संताप किंवा सूड याद्वारे कोणत्याही प्रकारे त्यांनी कायदेशीर तरतुदीचा गैरफायदा घेऊ नये तसेच सहानुभूतीच्या तत्त्वाच्या प्रभावाने दुसऱ्या पक्षाला त्रास देऊ नये. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या किंवा अभियोग करणाऱ्या संस्थेची भूमिका कधीकधी अतिसंवेदनशीलतेच्या खेळाशी स्पर्धा करण्यासाठी दुर्भावनापूर्ण प्रयत्न करण्याच्या संवेदनांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून उत्कृष्ट सहानुभूतीत रंगवली जाते. अशी परिस्थिती सामाजिक आपत्ती आणते ज्यामध्ये समाजाचे अनुलंब विभाजन करण्याची क्षमता असते. संवेदनशीलतेची भावना आणि सामाजिक

घटनेचा अभ्यास वस्तुनिष्ठतेने समजून घेणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत, संरक्षणात्मक विशेष कायदा आणणे विधिमंडळावर बंधनकारक आहे. तसेच संरक्षक उपाय समजून घेणे आणि त्याची छाननी करणे हे घटनात्मक न्यायालयांचे कर्तव्य आहे जेणेकरून त्याने सामाजिक संकटाला आळा बसेल. आम्ही सध्याच्या प्रकरणांमध्ये, भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम ४९८-अ (थोडक्यात, "भा. दं. सं".) वर लक्ष केंद्रित करत आहोत.

२. कलम ४९८-अ हे सन १९८३ मध्ये कायद्यात समाविष्ट करण्यात आले. कलम ४९८-अ भा. दं. सं. लागू करण्याचे उद्दिष्ट आणि कारणे गुन्हेगारी कायद्याच्या उद्देश आणि कारणांच्या विधानातून गोळा केली जाऊ शकतात. (दुसरी दुरुस्ती) १९८३ चा कायदा खालीलप्रमाणे वाचण्यात येतो .

> "हुंड्यासाठी होणाऱ्या मृत्यूंची वाढती संख्या ही गंभीर चिंतेची बाब आहे. हुंडा प्रतिबंध कायदा, १९६१ च्या कामकाजाचे परीक्षण करण्यासाठी स्थापन केलेल्या संयुक्त समिती च्या सभागृहाने वाईट अवस्थेच्या व्याप्तीवर भाष्य केले आहे. पती आणि पतीच्या नातेवाईकांनी केलेल्या क्रौर्याची प्रकरणे, ज्यांची परिणती संबंधित असहाय्य महिलेच्या आत्महत्येत किंवा हत्येत होते, अशा क्रौर्याचा समावेश असलेल्या प्रकरणांचा केवळ एक छोटासा भाग आहे. त्यामुळे भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता आणि भारतीय पुरावा कायद्यात योग्य ती दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव आहे, जेणेकरून केवळ हुंड्याच्या मृत्यूप्रकरणीच नव्हे तर विवाहित महिलेवर त्यांच्या सासरच्या मंडळींनी केलेल्या क्रौर्यालाही प्रभावीपणे समोर जाण्याचे सामर्थ्य मीळेल.

२. प्रस्तावित केलेले बदल खालीलप्रमाणे आहेतः-

(i) एखाद्या महिलेवर तिचा पती किंवा तिच्या पतीच्या कोणत्याही नातेवाईकाने केलेला अत्याचाराकरिता तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासाची दंडा सह शिक्षा होऊ शकेल अशा प्रकारे भारतीय दंड संहितेत सुधारणा करण्याचा प्रस्ताव आहे. पतीने किंवा पतीच्या इतर कोणत्याही नातेवाईकाचे अशा स्वरूपाचे जाणूनबुजून केलेलं वर्तन ज्यामुळे ती महिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त होते किंवा तिला गंभीर शारीरिक किंवा मानसिक इजा होण्याची शक्यता आहे, आणि तिच्या पतीकडून किंवा तिच्या पतीच्या कोणत्याही नातेवाईकाकडून महिलेला मालमत्तेसंबंधित कोणतीही बेकायदेशीर मागणी पूर्ण करण्यासाठी तिला किंवा तिच्या नातेवाईकांना बळजबरी करणे हा छळ म्हणून क्रौर्य ठरेल आणि तो दंडनीय असेल, जर गुन्हा घडल्यासंबंधीची माहिती पोलिस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्याला गुन्ह्यातील पीडित किंवा गुन्ह्यातील पीडित असलेल्या व्यक्तीचा नातेवाईक किंवा, अशा कोणत्याही नातेवाईकाच्या अनुपस्थितीत, सरकारच्या वतीने अधिकृत केलेल्या कोणत्याही सार्वजनिक सेवकाने दिली तर सदर गुन्हा दखलपात्र असेल. गुन्ह्यातील पीडितेने किंवा तिच्या वडिलांनी, आई, भाऊ, बहिणीने किंवा तिच्या वडिलांचा किंवा आईचा भाऊ किंवा बहीण किंवा न्यायालयाच्या परवानगीने रक्त, विवाह किंवा दत्तक नात्याने तिच्याशी संबंधित इतर कोणत्याही व्यक्तीने केलेल्या पोलिस रिपोर्ट किंवा तक्रारीशिवाय कोणतेही न्यायालय गुन्ह्याची दखल घेणार नाही, अशी तरतूद करण्यात आली आहे. (विधेयकाच्या खंड २, ५ आणि ६ अन्वये).

(ii) जिथे एखाद्या महिलेने, तिच्या लग्नाच्या सात वर्षांच्या आत आत्महत्या केली असेल किंवा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू पावली असेल, जिथे इतर कोणीतरी गुन्हा केला आहे असा वाजवी संशय निर्माण झाला असेल अश्या सर्व प्रकरणांमध्ये कार्यकारी दंडाधिकाऱ्यांकडून चौकशी आणि शव-विच्छेदन करण्याची तरतूद केली जात आहे. एखाद्या विवाहित महिलेचा तिच्या लग्नाच्या सात वर्षांच्या आत मृत्यू झाला असेल आणि अशा महिलेच्या नातेवाईकाने तिच्या शवविच्छेदनासाठी विनंती केली असेल अशा सर्व प्रकरणांमध्ये ही तरतूद केली जात आहे (विधेयकाच्या खंड ३ आणि ४ अन्वये).

(iii) भारतीय पुरावा कायदा, १८७२ मध्ये अशी तरतूद करण्यासाठी सुधारणा केली जात आहे की, जर एखाद्या महिलेने तिच्या लग्नाच्या तारखेपासून सात वर्षांच्या कालावधीच्या आत आत्महत्या केली असेल आणि तिचा पती किंवा तिच्या पतीच्या कोणत्याही नातेवाईकाने छळ केला असेल, तर न्यायालय असे गृहीत धरू शकते की तिच्या पतीने किंवा तिच्या पतीच्या नातेवाईकाने तीला आत्महत्येला प्रवृत्त केले होते (विधेयकाच्या खंड ७ अन्वये)

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा उद्देश आहे.

३. कलम ४९८-अ भा. दं. सं. च्या घटनात्मकतेबाबत, **सुशील कुमार शर्मा -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया आणि इतर**[१] प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की ---

"दंड संहितेच्या कलम ४९८-अ ची तरतूद असंवैधानिक आणि अधिकारबाह्य नाही. केवळ कायद्याच्या तरतुदीचा गैरवापर होण्याची शक्यता स्वतः कायद्याला अवैध ठरवत नाही. त्यामुळे कलम ४९८-अ ला कोणताही कायदेशीर किंवा घटनात्मक आधार नाही, हा युक्तिवाद मान्य नाही. हुंडयाच्या संकटाला आळा घालणे हा या तरतुदींचा उद्देश आहे. परंतु अशा अनेक घटना समोर आल्या आहेत ज्यांच्या तक्रारीत खरेपणा नाही आणि तिरकस हेतूने दाखल केल्या गेल्या आहेत. अशा प्रकरणांमध्ये आरोपींची निर्दोष मुक्तता केल्याने सर्व प्रकरणांमध्ये खटल्याच्या दरम्यान आणि त्यापूर्वी भोगलेली नाचक्की पुसली जात नाही. कधीकधी माध्यमांच्या प्रतिकूल बातम्यांमुळे दुःखात भर पडते. त्यामुळे, सुविचारित तरतुदीचा गैरवापर रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जाऊ शकतात हा प्रश्नच आहे. केवळ ही तरतूद घटनात्मक आणि अंतर्निहित असल्यामुळे, तत्वशून्य व्यक्तीनां वैयक्तिक सूड घेण्याचा किंवा छळ करण्याचा परवाना देत नाही. त्यामुळे, क्षुल्लक तक्रारी किंवा आरोप करणाऱ्यांशी योग्य प्रकारे कसे वागता येईल याचे मार्ग शोधणे विधिमंडळासाठी आवश्यक ठरते. तोपर्यंत न्यायालयांना सध्याच्या चौकटीत राहून परिस्थिती हाताळावी लागेल."

४. न्यायालयाने **बी. एस. जोशी आणि इतर - विरुद्ध - हरियाणा राज्य आणि इतर**[२] मध्ये असे निरीक्षण नोंदवले आहे कि -

"यात काही शंका नाही की भारतीय दंड संहितेत प्रकरण XX-A मध्ये समाविष्ट असलेले कलम ४९८–अ भारतीय दंड संहितेचा परिचय करण्याचा उद्देश महिलेचा

तिच्या पती किंवा तिच्या पतीच्या नातेवाईकांकडून होणारा छळ रोखणे हा होता. जे पत्नीला किंवा तिच्या नातेवाईकांना हुंड्याच्या बेकायदेशीर मागण्या पूर्ण करण्यासाठी जबरदस्ती त्रास देतात किंवा छळ करतात अश्या पती आणि त्याच्या नातेवाईकांना शिक्षा करण्याच्या उद्देशाने कलम ४९८–अ जोडण्यात आले होते. अति-तांत्रिक दृष्टिकोन प्रतिकूल फलदायी असेल आणि महिलांच्या हितसंबंधांच्या विरोधात आणि ज्या उद्देशासाठी ही तरतूद जोडली गेली होती त्या उद्देशाच्या विरोधात काम करेल. अशी शक्यता आहे की न्यायाची उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी कार्यवाही रद्दबातल करण्याच्या अंतर्निहित शक्तीचा वापर न केल्यास महिलांना न्याय मिळवण्यापासून वंचित ठेवल्या जाण्याची शक्यता आहे. भारतीय दंड संहितेच्या प्रकरण XX A चा हा उद्देश नाही.

५. **ब्रिजलाल -विरुद्ध- प्रेमचंद आणि इतर**[3] प्रकरणांमध्ये, या न्यायालयाने असा निकाल दिला आहे कि -

"भारतीय पुरावा कायद्यात कलम ११३-ए आणि ११३-बी आणि त्यानंतरच्या सुधारणांद्वारे भारतीय दंड संहितेत कलम ४९८-अ आणि ३०४-बी समाविष्ट करण्याचा संदर्भ येथे देणे आमच्यासाठी गैर ठरणार नाही. कलम ११३-ए पुरावा कायदा आणि ४९८-अ भारतीय दंड संहिता फौजदारी कायदा (दुसरी दुरुस्ती) अधिनियम १९८३ (१९८३ चा ४६ चा कायदा) आणि भारतीय पुरावा कायदा कलम ११३-बी आणि ३०४-बी भारतीय दंड संहिता १९८६ च्या अधिनियम क्रमांक ४३ द्वारे संबंधित

कायद्यांमध्ये लागू करण्यात आली आहे. हुंड्याच्या घातक व्यवस्थेमुळे, लोभी आणि तत्वशून्य पती, त्यांचे पालक आणि नातेवाईकांनी केलेल्या असहनीय मागण्यांमुळे समाजाची अधोगती झाली आहे, ज्यामुळे महिलांद्वारे आत्महत्या आणि हुंडा बळीच्या चिंताजनक संख्येमुळे विधिमंडळाच्या विवेकाला इतका धक्का बसला आहे की विधिमंडळाने वाईट गोष्टींचा सामना करण्यासाठी कायद्याच्या प्रक्रियात्मक तसेच ठोस अशा अतिरिक्त तरतुदी प्रदान करणे आवश्यक मानले आहे आणि परिणामी भारतीय पुरावा कायद्यात कलम ११३-ए आणि ११३-बी आणि भारतीय दंड संहितेतील कलम ४९८–अ आणि ३०४-बी समाविष्ट केले आहेत. कलम ११३-ए मुळे, एखाद्या महिलेने आत्महत्या केल्यास जर दोन घटक समाविष्ट असतील, ते म्हणजे (१) महिलेने तिच्या लग्नापासून सात वर्षांच्या कालावधीत आत्महत्या केली आणि (२) पतीने किंवा नातेवाईकाने तिच्यावर क्रूरता केली तर तिच्या पतीकडून किंवा नातेवाइकाद्वारे प्रोत्साहन दिले गेले होते असे न्यायालये गृहीत धरू शकतात. हुंडाबळीच्या वाढत्या धोक्याला आळा घालण्यासाठी भारतीय दंड संहिता आणि भारतीय पुरावा कायद्यात अतिरिक्त तरतुदी करण्याची गरज विधिमंडळाला जाणवली आहे हे दाखवण्यासाठीच आम्ही या तरतुदींचा संदर्भ देत आहोत...”

६. सध्या वास्तविकतेच्या दृष्टीने प्रस्तुत याचिका भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ अंतर्गत दाखल करण्यात आली आहे, ज्यात प्रतिवादींच्या क्रूरतेचा सामना करणाऱ्या विवाहित महिलांसाठी सक्षम वातावरण तयार करण्यासाठी आणि देखरेख करण्यासाठी आणि भा. दं. सं. कलम ४९८-अ अंतर्गत महिलांवरील हिंसाचाराच्या घटनांचे पद्धतशीरपणे

पुनरावलोकन करण्याची एकसमान प्रणाली तयार करण्यासाठी निर्देश मागितले असून त्यात त्यांचा बचाव, तपास, खटला चालवणे आणि पीडित आणि त्यांच्या मुलांचे केंद्र, राज्य आणि जिल्हा स्तरावर पुनर्वसन करणे हे समाविष्ट आहे. याशिवाय, भा.दं.सं. नुसार विवाहित महिलांवर केलेल्या क्रूरता आणि छळाच्या तक्रारीवरून त्वरित प्रथम खबरी अहवाल नोंदवण्यासाठी, देशाच्या कायद्याशी सुसंगत असलेल्या भा. दं. सं. कलम ४९८-अ च्या प्रकरणांमध्ये प्रथम खबरी अहवाल नोंदवणे, अटक करणे आणि जामीन मिळवणे या एकसमान धोरणासाठी प्रतिवादींना आदेशपत्र जारी करण्याची प्रार्थना करण्यात आली आहे.

७. याचिकाकर्त्यांनी असे म्हटले आहे की विवाहित महिलांवरील हिंसाचाराच्या घटनांवर देखरेख आणि पद्धतशीर पुनरावलोकनाची कोणतीही एकसमान प्रणाली नसल्यामुळे शेकडो महिलांना घरगुती अत्याचाराच्या नावाखाली किंवा मुलीच्या जन्मदात्या कुटुंबाकडून अधिक पैसे उकळण्याच्या हेतूने हिंसाचाराच्या भयानक कृत्यांना सामोरे जावे लागत आहे, ज्यामुळे भा. दं. सं. कलम ४९८-अ मधील कायदेशीर हेतू कमकुवत झाला आहे आणि, विवाहित महिलांच्या घरांमध्ये अस्वाभाविक मृत्यूंना कारणीभूत ठरणाऱ्या वाढत्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर, भा. दं. सं. कलम ४९८-अ कमी करणे शक्य नाही.

८. असा युक्तिवाद केला गेला आहे की कलम ४९८-अ भा. दं. सं लागू झाल्यापासून, अशी वाढत्या प्रमाणात निंदा केली गेली आहे की महिला याचा गैरवापर करुन वारंवार सासरच्या लोकांविरुद्ध शस्त्र म्हणून वापरतात. याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, भा. दं. सं. कलम ४९८-अ चा ढोबळपणे गैरवापर होत असल्याची सर्वसाधारण तक्रार असली

तरी, या तरतुदीचा किती वेळा गैरवापर केला गेला आहे हे दर्शविण्यासाठी कोणतीही ठोस माहिती नाही. पुढे, न्यायालय, भा. दं. सं. कलम ४९८-अ ची कठोरता हळूहळू कमी करून, न्यायालय या तरतुदीचा गैरवापर होत आहे या चुकीच्या आधारावर कार्यवाही करत आहे, जेव्हा की प्रत्यक्षात गैरवापर हा दंडात्मक तरतूद रद्द करण्यासाठी किंवा ती काढून घेण्यासाठी आधार असू शकत नाही.

९. याचिकेत असे नमूद करण्यात आले आहे की क्रूरता आणि छळाचा बळी ठरलेल्या समाजातील दुर्बल घटकांच्या संरक्षणासाठी भा.दं.सं. कलम ४९८-अ विशेषतः लागू करण्यात आले आहे. भा.दं.सं. चे कलम ४९८-अ मधिल उक्त तरतुदीची कठोरता कमी करण्यात आल्यामुळे यामागील सामाजिक हेतू गमावला जात आहे, आणि अलीकडील घोषित **राजेश शर्मा आणि इतर-विरुद्ध- उत्तर प्रदेश राज्य आणि इतर**[४] यासह न्यायालयाच्या विविध निर्णयांद्वारे निर्धारित केलेल्या विविध पात्रता आणि निर्बंधांमुळे हा गुन्हा व्यावहारिकदृष्ट्या जामीनपात्र करण्यात आला आहे.

१०. याचिकाकर्त्यांनी असेही सादर केले आहे की विवाहित महिलांच्या तक्रारीवरून पोलीस आरोपीला अटक करण्यास संकोच करतात आणि विविध निर्णयांचा हवाला देऊनया निष्क्रियतेचे समर्थन केले जाते. जेव्हा की भा.दं.सं.चे कलम ४९८-अ हे अजामीनपात्र गुन्ह्याचा खुलासा करते आणि कलम ४१ फौ. प्र. सं. अंतर्गत पुरेसे नियंत्रण व संतुलन पुरविते. मनमानी आणि आवश्यक अटक रोखण्यासाठी, कायद्यात अगदी स्पष्टपणे म्हटले आहे की पोलिसांनी अटक करण्याची तसेच अटक न करण्याची समर्थित कारणे

नोंदवावीत.

११. याचिकाकर्त्यांनी असेही म्हटले आहे की भा.दं.सं. कलम ४९८-अ अंतर्गत नोंदवलेल्या प्रकरणांचा मागोवा घेण्यासाठी देखरेख यंत्रणेचा अभाव आहे ज्यामध्ये कमी प्रमाणात दोषसिद्धी होण्याच्या कारणांचा पद्धतशीर अभ्यास केला जातो आणि या अनुपस्थितीमुळे दंडात्मक कायदे महिलांना सुरक्षित वैवाहिक वातावरण मिळवून देऊ शकलेले नाहीत. याचिकाकर्त्यांच्या मते, यामुळे आयपीसी कलम ४९८-अ अंतर्गत प्रकरणांमध्ये वाढ झाली आहे कारण या तरतुदीचा प्रतिबंधात्मक परिणाम कमी होत आहे. याचिकाकर्त्यांचे असेही म्हणणे आहे की भा.दं.सं. कलम ४९८-अ अंतर्गत गुन्ह्याचा पोलिसांकडून केलेला तपास अनेकदा अव्यावसायिक आणि कठोर पद्धतीचा असतो आणि तपास अधिकारी दोन्ही पक्षांच्या समजुतीने प्रभावित होतात ज्यामुळे गुन्हेगार दोषसिद्धीतून सुटतात.

१२. पुढे असा युक्तिवाद केला जातो की, भा.दं.सं. च्या कलम ४९८-अ अंतर्गत अनेक प्रकरणांमध्ये न्यायालयाने महिलेवर झालेल्या मानसिक क्रौर्याचा विचार केला नसून केवळ शारीरिक क्रौर्यामुळे होणाऱ्या खुणांकडे लक्ष केंद्रित केले आहे, ज्यामुळे असा पुरावा जर महिलेचा शारीरिक छळ झाल्याचे दर्शवत नसेल तर न्यायालये सदर प्रकरणाची चौकशी करत नाहीत. यामुळे न्यायालयांनी अनेक प्रसंगी त्या महिलांना अतिसंवेदनशील किंवा कमी सहिष्णुतेची पातळी असलेल्या महिला म्हणून चिन्हांकित केले आहे.

१३. पुढे स्पष्ट करण्यात आले आहे की दंडात्मक तरतुदीचा कथित गैरवापर मुख्यतः सुशिक्षित महिलांद्वारे केली जातो ज्यांना हे माहित आहे की हा गुन्हा दखलपात्र आणि अजामीनपात्र दोन्ही आहे आणि ज्या द्वारे पुरुषाला तुरुंगात टाकून महिलेच्या तक्रारीवर उत्स्फूर्तपणे काम करते, परंतु गरीब आणि अशिक्षित महिलांना भा.दं.सं. च्या कलम ४९८-अ अंतर्गत दिलेले संरक्षण नाकारण्याचा हा आधार असू शकत नाही त्याऐवजी क्रूरतेविरुद्ध विशेषतः ग्रामीण भागात महिलांच्या संरक्षणासाठीच्या कायद्यांविषयी आणि उल्लंघन झाल्यास उपलब्ध असलेल्या उपायांबद्दल जागरूकता निर्माण करण्याची गरज आहे.

१४. याचिकेत पुढे असे नमूद केले आहे की हुंडा प्रतिबंध कायदा १९६१ हा जरी पारित केलेला असला तरी विडंबना अजूनही जास्त प्रमाणात सक्रिय आहे कारण हुंडा पद्धती ही सामाजिक दुष्टता वाढवीत आहे आणि ती उघडपणे अभिमानाने पाळली जाते. पुढे असे म्हटले आहे की, आजही महिलांवर अत्याचार केले जातात आणि अनेकदा न्यायालय, अंतिम तारणहार असूनही, या महिलांच्या बचावासाठी येत नाही, परिणामी द्विधा वातावरण निर्माण होते आणि अशा सामाजिक द्विधतेमुळे जरी गुन्हा व्यक्तीशी संबंधित असतो तरी यामुळे दोन वर्गांमध्ये युद्धाची परिस्थिती निर्माण होते. एक खेदजनक स्थिती ठामपणे मांडली आहे.

१५. उपरोक्त मुलभूत तत्वांवर, रिट याचिका (दिवाणी) क्र.७३/२०१५ मध्ये भा.दं.सं. च्या कलम ४९८-अ च्या प्रकरणांमध्ये प्रथम खबरी अहवाल, अटक आणि जामीन नोंदवण्याचे एकसमान धोरण तयार करण्यात यावे अशी प्रार्थना करण्यात आली आहे. येथे हे लक्षात घेण्यासारखे आहे की सदर रिट याचिका प्रलंबित असताना, **राजेश शर्मा**

(उपरोल्लेखित) मध्ये न्यायनिर्णय देण्यात आला होता. **राजेश शर्मा** (उपरोल्लेखित) प्रकरणात न्यायालयाने खालील मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत ----

"१९.i) (ए) प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणांद्वारे एक किंवा अधिक कुटुंब कल्याण समित्यांची स्थापना करण्यात यावी, ज्यात शक्यतो तीन सदस्यांचा समावेश असावा. अशा समित्यांच्या स्थापनेचा आणि कामकाजाचा वेळोवेळी आणि वर्षातून किमान एकदासंबंधित जिल्ह्याचे जिल्हा आणि सत्र न्यायाधीश, जे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष देखील आहेत, त्यांनी आढावा घ्यावा .

(बी) सहाय्यक विधी स्वयंसेवक /सामाजिक कार्यकर्ते /सेवानिवृत्त व्यक्ती/कार्यरत अधिकाऱ्यांच्या पत्नी/इतर नागरिक, जे योग्य आणि इच्छुक आढळतील, अश्या व्यक्तींसह समित्यांची स्थापना केली जाऊ शकते.

(सी) समितीच्या सदस्यांना साक्षीदार म्हणून बोलावले जाणार नाही.

(डी) कलम ४९८-अ अन्वये पोलिसांना किंवा दंडाधिकाऱ्यांना प्राप्त झालेली प्रत्येक तक्रार अशा समितीकडे पाठवली जावी आणि त्यमधे समितीने लक्ष घालावे. अशी समिती पक्षकाराशी वैयक्तिकरित्या किंवा दूरध्वनीद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक संप्रेषणाच्या इतर कोणत्याही माध्यमातून संवाद साधू शकते .

(ई) अशा समितीचा अहवाल तक्रार प्राप्त झाल्याच्या तारखेपासून कमीतकमी एक महिन्याच्या आत ज्या प्राधिकरणाद्वारे तक्रार पाठवली गेली त्या प्राधिकरणाला देण्यात यावा .

(एफ) समिती या प्रकरणातील तथ्यात्मक पैलू आणि आपले मत याबद्दल आपला संक्षिप्त अहवाल देऊ शकते.

(जी) समितीचा अहवाल मिळेपर्यंत, सहसा कोणत्याही प्रकारची अटक करण्यात येऊ नये .

(एच) त्यानंतर तपास अधिकारी किंवा दंडाधिकारी अहवालाचा विचार त्याच्या गुणवत्तेनुसार करू शकतात.

(आय) विधी सेवा समितीला आवश्यक वाटेल असे किमान मूलभूत प्रशिक्षण समितीच्या सदस्यांना वेळोवेळी देण्यात यावे.

(जे) समितीच्या सदस्यांना योग्य मानले जाणारे मानधन दिले जाऊ शकते.

(के) जिल्हा आणि सत्र न्यायाधीशांना जेथे आवश्यक आणि योग्य वाटेल तेथे खर्च निधी वापरण्याची मुभा असेल.

ii) कलम ४९८-अ आणि इतर संबंधित गुन्ह्यांविरुद्ध तक्रारींचा तपास केवळ परिसरातील नियुक्त तपासी अधिकारीच करू शकतो. अशी पदनामे आजपासून एका महिन्याच्या आत केली जाऊ शकतात. अशा नियुक्त अधिकाऱ्याला योग्य मानल्या जाणाऱ्या कालावधीसाठी (एका आठवड्यापेक्षा कमी नाही) प्रशिक्षण घेणे आवश्यक असेल. प्रशिक्षण आजपासून चार महिन्यांत पूर्ण केले जाऊ शकते;

iii) ज्या प्रकरणांमध्ये तोडगा निघाला असेल, त्या प्रकरणांमध्ये जिल्हा आणि सत्र न्यायाधीश किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या जिल्ह्यातील इतर कोणत्याही वरिष्ठ न्यायिक

अधिकाऱ्याला, वाद प्रामुख्याने वैवाहिक वैमनस्यांशी संबंधित असल्यास फौजदारी खटला बंद करण्यासह कार्यवाही निकाली काढण्याची मुभा असेल.

iv) सरकारी वकील/तक्रारदाराला किमान एका दिवसाच्या स्पष्ट नोटीससह जामीन अर्ज दाखल केला असल्यास, सदर अर्जावर शक्यतोवर त्याच दिवशी निर्णय घेतला जाऊ शकतो. जेथे पत्नी/अल्पवयीन मुलांचे पालनपोषण किंवा इतर अधिकार अन्यथा संरक्षित केले जाऊ शकतात, तेथे वादग्रस्त हुंडा वस्तूंची वसुली हा एकमेव जामीन नाकारण्याचे कारण असू शकत नाही. हे सांगण्याची गरज नाही की जामिनाचे प्रकरण हाताळताना, वैयक्तिक भूमिका, आरोपांचे सकृतदर्शनी सत्य, पुढील/अटक कोठडीची आवश्यकता आणि न्यायाचे हित यांचे काळजीपूर्वक मोजमाप केले गेले पाहिजे;

v) सामान्यतः भारताबाहेर राहणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत पारपत्र जप्त करणे किंवा रेड कॉर्नर नोटीस जारी करणे हा नित्यक्रम असू नये.

vi) जिल्हा न्यायाधीश किंवा जिल्हा न्यायाधीशांनी नामनिर्देशित केलेल्या पदसिद्ध वरिष्ठ न्यायिक अधिकाऱ्याला वैवाहिक विवादांमुळे उद्भवलेल्या पक्षांमधील सर्व संबंधित प्रकरणे एकत्र करण्याची मुभा असेल, जेणेकरून अशी सर्व प्रकरणे ज्या न्यायालयाकडे सोपवली गेली आहेत त्या न्यायालयाद्वारे सर्वांगीण दृष्टिकोन ठेवला जाईल; आणि

vii) कुटुंबातील सर्व सदस्यांना आणि विशेषतः बाहेर गावी राहणाऱ्या सदस्यांना व्यक्तिशः हजर राहण्याची आवश्यकता नाही आणि खटल्याच्या प्रगतीवर विपरित

परिणाम न करता न्यायचौकशी न्यायालयाने हजर राहण्याची परवानगी देण्यापासून सूट दिली पाहिजे किंवा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे व्यक्तिशः हजर राहण्याची परवानगी दिली पाहिजे .

viii) सदर निर्देश प्रत्यक्ष शारीरिक इजा किंवा मृत्यू असलेल्या गुन्ह्यांना लागू होणार नाहीत."

१६. दरम्यान, रीट याचिका (फौजदारी) क्र.१५६/२०१७ दाखल करण्यात आली होती. सदर रिट याचिकेत तीन सदस्यांपैकी किमान दोन सदस्यांची कुटुंब कल्याण समितीत नियुक्ती करावी, या सूचनेची अंमलबजावणी करण्याची विनंती करण्यात आली होती. जेव्हा ही रिट याचिका दिनांक १३/१०/२०१७ ला सूचीबद्ध करण्यात आली, तेव्हा खालील आदेश पारित करण्यात आला होता .

"याचिकाकर्त्याचे विद्वान वकील श्री. आलोक सिंग यांनी रिट याचिकेत जरी वेगळ्या मागण्या केल्या असल्या, तरी या न्यायालयाने १२६५/२०१७ च्या फौजदारी अपील मध्ये दिलेल्या मूलभूत निर्देशांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे [राजेश शर्मा विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य सरकार आणि इतर]. याव्यतिरिक्त, विद्वान वकीलांचे असे म्हणणे आहे की काही महिला सदस्य, काही संस्था आणि कल्याणकारी समित्यानी यात सहभागी होणे आवश्यक आहे .

या टप्प्यावर, आम्हास हे सांगणे बंधनकारक आहे की आम्ही राजेश शर्मा (उपरोल्लेखित) मध्ये दिलेल्या निर्णयाशी सहमत नाही कारण भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८-अ अंतर्गत छळ केल्या जाणाऱ्या महिलांच्या हक्कांमध्ये खरोखरच कपात होते असे मानण्यास आम्ही तयार आहोत. याशिवाय, सकृतदर्शनी, आम्हाला असे

वाटते की मार्गदर्शक तत्त्वे विधिमंडळाच्या क्षेत्रात असू शकतात.

उत्तरवादी क्रमांक १ ते ३ ला नोटीस जरी करण्यात याव्या. उत्तरवादी क्रमांक ४ ला नोटीस जरी करण्याची आवश्यकता नाही. जरी याचिकाकर्त्याने पावले उचलली नाहीत, तरी प्रबंधक प्रतिवादींना नोटीस तामिल केली जात आहे की नाही याची काळजी प्रबंधक घेतील. श्रीमती. इंदू मल्होत्रा आणि विद्वान ज्येष्ठ विधिज्ञ श्री. व्ही. शेखर यांची या प्रकरणात न्यायालयाला मदत करण्यासाठी न्यायमित्र म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रकरण २९ नोव्हेंबर २०१७ रोजी सूचीबद्ध करण्यात यावे .

१७. विद्वान ज्येष्ठ विधिज्ञ श्री. व्ही. शेखर यांची न्यायालयाला मदत करण्यासाठी या प्रकरणात न्यायमित्र म्हणून नियुक्ती करण्यात आली.

१८. विद्वान न्यायमित्र यांनी सादर केले कि **राजेश शर्मा** (उपरोल्लेखित) मध्ये पारित केलेल्या न्यायनिर्णयाचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे कारण या न्यायनिर्णयामुळे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने स्थापन केलेल्या कुटुंब कल्याण समितीला अधिकार प्रदान केले आहेत, जी भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८-अ अंतर्गत फौजदारी तक्रारींची प्रथमतः चौकशी करण्यासाठी विधी स्वयंसेवक/सामाजिक कार्यकर्ते/सेवानिवृत्त व्यक्ती/कार्यरत अधिकाऱ्यांच्या पत्नी/इतर नागरिकांची एक अतिरिक्त न्यायिक समिती आहे आणि पुढे असे निर्देश देण्यात आले आहेत की जोपर्यंत समितीचा अहवाल प्राप्त होत नाही तोपर्यंत अटक करण्यात येऊ नये. भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८-अ अंतर्गत फौजदारी तक्रारींची चौकशी करण्यासाठी एफ. डब्ल्यू. सी. ची स्थापना ही फौजदारी प्रक्रिया संहितेअंतर्गत विहित

केलेल्या प्रक्रियेच्या विरुद्ध आहे, असे आवाहन केले आहे.

१९. पुढे असे प्रतिपादन करण्यात आले आहे की **राजेश शर्मा** (उपरोल्लेखित) मधील निर्णयाच्या काही परिच्छेदातील निर्देश जिल्हा व सत्र न्यायाधीश किंवा त्यांच्याद्वारे नामनिर्देशित अन्य वरिष्ठ न्यायिक अधिकारी यांनी भा. दं. सं. च्या कलम ४९८-अ अंतर्गत कार्यवाही निकाली काढण्याचे अधिकार सोपवले आहेत. त्यामधे कलम ४९८-अ अन्वये गुन्ह्यासाठी अनुज्ञेय नसलेल्या प्रकरणांमध्ये तोडगा काढता येणार नाही आणि म्हणून असा अधिकार कोणत्याही जिल्हा व सत्र न्यायाधीशाला किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही वरिष्ठ न्यायिक अधिकाऱ्याला बहाल केला जाऊ शकत नाही. या निवेदनाचा तपशील देताना असे स्पष्ट केले जाते की, पक्षांमध्ये तडजोड झाल्यास कलम ४८२ फौ. प्र. सं. अंतर्गत सदर कारवाई रद्दबातल करण्याचा अधिकार उच्च न्यायालयला आहे. विद्वान न्यायमित्र पुढे म्हणाले की, हुंड्यातील वादग्रस्त वस्तूंची वसुली हा जामीन नाकारण्याचा एक आधार असूच शकत नाही, खटल्यातील वस्तुस्थिती आणि परिस्थितींप्रमाणे जामीन अर्ज मंजूर करण्याचा निर्णय घेण्याचा न्यायालयाचा विवेकाधिकार आहे आणि अशा प्रकारे, हे अशा निर्देशासारखे आहे ज्याची कायद्यामधे हमी नाही. सामान्यतः भारताबाहेर राहणाऱ्या व्यक्तींचे पारपत्र जप्त करू नये किंवा त्यांना रेड कॉर्नर नोटीस जारी करू नये, असे सांगणाऱ्या परिच्छेद १९ (v) मधील निर्देशासंदर्भात टीका करण्यात आली आहे. असे आवाहन करण्यात आले आहे की जर एखादा आरोपी वैवाहिक/कौटुंबिक गुन्ह्याशी संबंधित तपासात सामील होत नसल्यास सक्षम न्यायालय संबंधित अधिकाऱ्यांना रेड कॉर्नर नोटीस जारी करण्यासाठी योग्य निर्देश जारी करू शकते जे प्रकरणाच्या तथ्यांवर अवलंबून असेल.

२०. विद्वान न्यायमित्र पुढे म्हणाले की, कुटुंबातील बाहेर राहणाऱ्या सदस्यांची

वैयक्तिक उपस्थिती अनिवार्य नाही, कारण फौजदारी कारवाईमध्ये, सक्षम न्यायालय जे अनुपस्थितीची सूट मान्य करण्याचा अर्ज हाताळणाऱ्या सक्षम न्यायालयाला न्यायिक विवेकबुद्धीचा वापर करण्याची परवानगी दिली जावी आणि या न्यायालयाने सामान्य निर्देश देणे गरजेचे नव्हते. विद्वान न्यायमित्रांनी काही सूचना दिल्या आहेत, ज्यांचा संदर्भ आपण संबंधित टप्प्यावर घेऊ.

२१. या वादाचे समर्थन करण्यासाठी, भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८-अ ची व्याप्ती समजून घेणे आवश्यक आहे. त्यात असे लिहिले आहे की -----.

> "**४९८-अ. एखाद्या महिलेचा पती किंवा पतीच्या नातेवाईकाने तीचा छळ करणे** - जो कोणी, एखाद्या महिलेचा पती किंवा पतीचा नातेवाईक, अशा महिलेवर क्रूरता करतो, त्याला तीन वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते आणि दंडही होऊ शकतो.
>
> स्पष्टीकरण.- या कलमाच्या उद्देशाने, "क्रूरता" म्हणजे ---
>
> (अ) एखाद्या महिलेला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे किंवा एखाद्या महिलेच्या आयुष्याला, अवयवाला किंवा आरोग्याला (मग मानसिक किंवा शारीरिक) गंभीर दुखापत होण्याची शक्यता असलेल्या स्वरूपाचे जाणूनबुजून केलेले कोणत्याही प्रकारचे वर्तन.
>
> (ब) तिला किंवा तिच्याशी संबंधित कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही मालमत्तेची किंवा मौल्यवान सुरक्षेची कोणतीही बेकायदेशीर मागणी पूर्ण करण्यास भाग पाडण्याच्या उद्देशाने असा छळ केला जात असेल किंवा ती किंवा तिच्याशी संबंधित कोणत्याही व्यक्तीने अशी मागणी पूर्ण करण्यात अयशस्वी ठरल्यामुळे महिलेचा

केलेला छळ."

२२. सदर गुन्हा दखलपात्र आणि अजामीनपात्र आहे. **अर्नेश कुमार -विरुद्ध- बिहार राज्य आणि अन्य**[५] या प्रकरणात या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आहे की, हा गुन्हा दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा आहे, ज्यामुळे असंतुष्ट पत्नींकडून शस्त्र म्हणून वापरल्या जाणाऱ्या तरतुदींमध्ये त्याला साशंक अभिमानाचे स्थान मिळाले आहे. या तरतुदीनुसार पती आणि त्याच्या नातेवाईकांना अटक करणे हा छळ करण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे. न्यायालयाने गृह मंत्रालयाच्या राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाने प्रकाशित केलेल्या "भारतातील गुन्हे २०१२ सांख्यिकी" अंतर्गत आकडेवारीची दखल घेतली आहे, ज्यामध्ये कलम ४९८-अ अंतर्गत गुन्ह्यासाठी २०१२ या वर्षात संपूर्ण भारतभरातील १,९७,७६२ व्यक्तींना अटक केल्याचे दिसून येते. त्यावर न्यायालयाने चिंता व्यक्त करून असे म्हंटले आहे कि अटकेमुळे अपमान होतो, स्वातंत्र्य कमी होते आणि जखमा कायमस्वरूपी राहतात आणि त्याचा धडा जो फौजदारी प्रक्रिया संहितेत अंतर्भूत आणि मूर्त आहे तो पोलीस शिकलेच नाही. पोलिसांवर भाष्य करताना न्यायालयाने असे म्हंटले आहे की -

> "स्वातंत्र्याच्या सहा दशकांनंतरही ते आपल्या वसाहतवादी प्रतिमेतून बाहेर आलेले नाही, ते मुख्यत्वे छळ, दडपशाहीचे साधन मानले जाते आणि निश्चितच जनतेचे मित्र मानले जात नाही. अटकेच्या कठोर अधिकाराचा वापर करताना सावधगिरी बाळगण्याच्या गरजेवर न्यायालयांनी वारंवार भर दिला आहे, परंतु त्याचा अपेक्षित परिणाम दिसून आलेला नाही. अटक करण्याचा अधिकार त्याच्या अहंकारात मोठ्या प्रमाणात योगदान देतो तसेच ते तपासण्यात दंडाधिकारी अपयशी ठरतात. एवढेच

नव्हे, तर अटक करण्याचा अधिकार हा पोलिसांना भ्रष्टाचाराचे आमीष देणाऱ्या साधनांनपैकी एक आहे. आधी अटक करून नंतर बाकीच्यांबरोबर पुढे जाण्याची वृत्ती घृणास्पद आहे. संवेदनशीलतेचा अभाव असलेल्या किंवा तिरकस हेतूने वागणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांसाठी हे एक उपयुक्त साधन बनले आहे."

२३. त्यानंतर न्यायालयाने अधिकारांमध्ये फरक केला आहे आणि त्यानंतर न्यायालयाने अटक करण्याची शक्ती आणि त्याचा वापर करण्याचे समर्थन यात फरक केला आहे आणि कलम ४१ फौ.प्र.सं चे विश्लेषण केले आहे. कलम ४१ मध्ये असे नमूद केले आहे की पोलीस वॉरंटशिवाय केव्हा अटक करू शकतात. ही तरतूद पुढीलप्रमाणे अशी आहे.-

"**४१. पोलीस वॉरंटशिवाय केव्हा अटक करू शकतात -** (१) कोणताही पोलीस अधिकारी दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय आणि वॉरंटशिवाय कोणत्याही व्यक्तीला अटक करू शकतो -

(ए) जेव्हा तो पोलीस अधिकाऱ्याच्या उपस्थितीत दखलपात्र गुन्हा करतो ;

(बी) ज्याच्याविरुद्ध वाजवी तक्रार करण्यात आली आहे किंवा विश्वासार्ह माहिती प्राप्त झाली आहे, किंवा वाजवी शंका अस्तित्वात आहे की त्याने सात वर्षांपेक्षा कमी कालावधीच्या शिक्षेची तरतूद असलेला किंवा सात वर्षांपर्यंतच्या शिक्षेस दंडासह किंवा दंडाशिवाय पात्र असलेला दखलपात्र गुन्हा केला आहे, अश्या परिस्तिथीत जर खालील अटी पूर्ण झाल्या असतील तर म्हणजे :-

(i) जेव्हा अशा तक्रारीच्या, माहितीच्या किंवा संशयाच्या आधारे अशा व्यक्तीने

उक्त गुन्हा केला आहे असे मानण्याचे कारण पोलिस अधिकाऱ्याकडे असल्यास;

(ii) अशा प्रकारची अटक आवश्यक आहे असे पोलीस अधिकाऱ्याचे समाधान झाल्यास -

(ए) अशा व्यक्तीला पुढील कोणताही गुन्हा करण्यापासून रोखणे; किंवा

(बी) गुन्ह्याच्या योग्य तपासासाठी; किंवा

(सी) अशा व्यक्तीला गुन्ह्याचा पुरावा नष्ट करण्यापासून किंवा अशा पुराव्यांशी कोणत्याही प्रकारे छेडछाड करण्यापासून रोखणे; किंवा

(डी) अशा व्यक्तीला प्रकरणातील तथ्यांशी परिचित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला कोणतेही प्रलोभन, धमकी किंवा वचन देण्यापासून रोखणे, जेणेकरून न्यायालयाला किंवा पोलिस अधिकाऱ्याला अशी तथ्ये उघड करण्यापासून त्याला परावृत्त करता येईल; किंवा

(ई) अशा व्यक्तीला अटक केल्याशिवाय, जेव्हा न्यायालयात आवश्यक असेल तेव्हा त्याची उपस्थिती सुनिश्चित केली जाऊ शकत नाही.

आणि अशी अटक करताना पोलिस अधिकारी त्याची कारणे लेखी नोंदवेल.

परंतु, या उप-कलमाच्या तरतुदींनुसार एखाद्या व्यक्तीला अटक करण्याची आवश्यकता नसलेल्या सर्व प्रकरणांमध्ये, पोलीस अधिकारी अटक न करण्याची कारणे लेखी नोंदवतील.

(बीए) ज्याच्याविरुद्ध अशी विश्वासार्ह माहिती प्राप्त झाली आहे की त्याने सात वर्षांहून अधिक काळापर्यंतच्या कारावासाची दंडासह किंवा दंडाविना किंवा मृत्युदंडासह शिक्षा होऊ

शकणारा दखलपात्र गुन्हा केला आहे आणि त्या माहितीच्या आधारे अशा व्यक्तीने उक्त गुन्हा केला आहे यावर विश्वास ठेवण्यास पोलिस अधिकाऱ्याला कारण आहे .

(सी) ज्याला या संहितेअंतर्गत किंवा राज्य सरकारच्या आदेशाद्वारे गुन्हेगार म्हणून घोषित केले गेले आहे; किंवा

(डी) ज्यांच्या ताब्यात चोरीला गेलेली मालमत्ता असल्याची वाजवीपणे शंका असणारी कोणतीही वस्तू सापडली आहे आणि ज्यांनी अशा गोष्टीच्या संदर्भात गुन्हा केला आहे असा वाजवीपणे संशय येऊ शकतो; किंवा

(ई) कर्तव्य बजावत असतांना पोलिस अधिकाऱ्याला अडथळा आणणारा किंवा कायदेशीर कोठडीतून पळून गेलेला किंवा पळून जाण्याचा प्रयत्न करणारा; किंवा

(एफ) ज्याला कोणत्याही संघराज्याच्या सशस्त्र दलातून पळून गेल्याचा संशय आहे; किंवा

(जी) जो संबंधित आहे, किंवा ज्याच्या विरोधात वाजवी तक्रार करण्यात आली आहे, किंवा विश्वासार्ह माहिती प्राप्त झाली आहे, किंवा कोणत्याही प्रकरणात त्याचा संबंध असल्याची वाजवी शंका अस्तित्वात आहे, भारताबाहेरील कोणत्याही ठिकाणी केलेले कृत्य, जे भारतात केले गेले असते, तर ते गुन्हा म्हणून दंडनीय असते आणि ज्यासाठी तो प्रत्यार्पणाशी संबंधित कोणत्याही कायद्याखाली किंवा अन्यथा भारतात ताब्यात घेण्यास किंवा ताब्यात घेण्यास पात्र असतो; किंवा

(एच) जो सुटका झालेला दोषी, कलम ३५६ च्या उपकलम (५) अंतर्गत केलेल्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन करतो; किंवा

(आय) ज्याच्या अटकेसाठी लेखी किंवा तोंडी अशी कोणतीही मागणी दुसऱ्या पोलीस अधिकाऱ्याकडून प्राप्त झाली आहे, परंतु या मागणीत अटक करावयाची व्यक्ती आणि ज्या गुन्ह्यासाठी अटक करायची आहे तो गुन्हा किंवा इतर कारण निर्दिष्ट केले आहे आणि त्यातून असे दिसते की ज्या अधिकाऱ्याने मागणी जारी केली आहे त्या अधिकाऱ्याकडून वॉरंटशिवाय त्या व्यक्तीला कायदेशीररित्या अटक केली जाऊ शकते.

(२) कलम ४२ च्या तरतुदींना अधीन राहून, अदखल पात्र गुन्ह्यातील कोणत्याही संबंधित व्यक्तीला किंवा ज्याच्या विरोधात तक्रार करण्यात आली आहे किंवा विश्वासार्ह माहिती प्राप्त झाली आहे किंवा असे संबंधित असल्याची वाजवी शंका अस्तित्वात आहे अशा कोणत्याही व्यक्तीला दंडाधिकाऱ्याच्या वॉरंट किंवा आदेशाशिवाय अटक केली जाणार नाही."

२४. उक्त तरतुदीची छाननी करताना न्यायालयाने खालीलप्रमाणे निर्णय दिला आहे .

> "७.१ उपरोक्त तरतुदीच्या वरवरच्या वाचनावरून असे दिसून येते की, एखाद्या गुन्ह्याचा आरोप असलेल्या व्यक्तीला सात वर्षांपेक्षा कमी कालावधीच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते किंवा दंडासह किंवा दंडाशिवाय सात वर्षांपर्यंत शिक्षा वाढू शकते, अशा व्यक्तीला उपरोक्त प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केल्याचे समाधानावर पोलिस अधिकारी अटक करू शकत नाहीत. अटक करण्यापूर्वी पोलिस अधिकाऱ्याने अशा प्रकरणांमध्ये अधिक समाधानी असणे आवश्यक आहे की अशा व्यक्तीला पुढील कोणताही गुन्हा करण्यापासून रोखण्यासाठी अशी अटक आवश्यक आहे; किंवा प्रकरणाच्या योग्य तपासासाठी; किंवा आरोपीला गुन्ह्याचा पुरावा नष्ट

करण्यापासून रोखण्यासाठी; किंवा अशा पुराव्याशी कोणत्याही प्रकारे छेडछाड करणे; किंवा अशा व्यक्तीला साक्षीदाराला कोणतीही प्रलोभन, धमकी किंवा वचन देण्यापासून प्रतिबंधित करणे जेणेकरून त्याला न्यायालयला किंवा पोलीस अधिकाऱ्याला अशी तथ्ये उघड करण्यापासून परावृत्त करणे; किंवा जोपर्यंत अशा आरोपीला अटक केली जात नाही तोपर्यंत त्याची न्यायालयात हजेरी आवश्यक असेल तेव्हा खात्री करता येत नाही. हे असे निष्कर्ष आहेत, ज्यांवर एखादी व्यक्ती तथ्यांच्या आधारे पोहोचू शकते.

X X X X X

७.३ अटकेपूर्वी पोलीस अधिकाऱ्याने स्वत:ला एक प्रश्न विचारला पाहिजे की, अटक का ? त्याची खरोखरच गरज आहे का? यामुळे कोणता उद्देश सफल होईल? त्यातून कोणता हेतू साध्य होईल? हे प्रश्न सोडवल्यानंतर आणि वर नमूद केल्याप्रमाणे एक किंवा इतर अटी पूर्ण झाल्यानंतरच अटकेच्या अधिकाराचा वापर करणे आवश्यक आहे. दंडाच्या बाबतीत, अटक करण्यापूर्वी प्रथम माहिती आणि पुराव्याच्या आधारे पोलीस अधिकाऱ्यांना विश्वास असणे आवश्यक आहे कि सदर गुन्हा आरोपीनेच केला आहे. याव्यतिरिक्त, कलम ४१ फौ.प्र. सं. च्या कलम (१) च्या उपखंड (अ) ते (ई) द्वारे संकल्पित केलेल्या एक किंवा अधिक हेतूंसाठी अटक आवश्यक आहे, असे पोलीस अधिकाऱ्याला पुढे समाधान असावे लागेल.

२५. त्यानंतर विद्यमान न्यायाधीशांनी फौजदारी प्रक्रिया संहिता (दुरुस्ती) कायदा, २००८ (२००९ च्या ५) च्या कलम ६ द्वारे समाविष्ट केलेल्या कलम ४१-ए चा संदर्भ दिला. उक्त

तरतूद खालीलप्रमाणे आहे :-

"४१ -अ. पोलीस अधिकाऱ्यासमोर हजर राहण्याची सूचना.- (१) कलम ४१ च्या उप-कलम (१) च्या तरतुदींनुसार एखाद्या व्यक्तीला अटक करणे आवश्यक नसलेल्या सर्व प्रकरणांमध्ये पोलीस अधिकारी, ज्या व्यक्तीविरुद्ध वाजवी तक्रार केली गेली आहे किंवा विश्वसनीय माहिती प्राप्त झाली आहे किंवा त्याने दखलपात्र गुन्हा केला आहे असा वाजवी संशय आहे, अशा व्यक्तीला त्याच्यासमोर किंवा नोटीसमध्ये नमूद केलेल्या इतर ठिकाणी हजर राहण्यासाठी निर्देश देणारी नोटीस जारी करेल.

(२) अशी नोटीस जर कोणत्याही व्यक्ती विरुद्ध जारी करण्यात आली असेल तर सदर नोटीसच्या अटींची पूर्तता करण्याची त्या व्यक्तीची जबाबदारी आहे .

(३)अश्या अव्यक्तीने नोटीस चे पालन केल्यास आणि सतत पालन करीत राहिल्यास, अश्या व्यक्तीला सदर नोटिस मध्ये नमूद केलेल्या गुन्ह्याकरीता अटक करण्याची गरज नाही जोपर्यंत पोलीस अधिकाऱयांच्या मते सदर व्यक्तीला काही कारणांस्तव अटक करणे आवश्यक आहे असे वाटत असेल.

(४) अशी व्यक्ती कोणत्याही वेळी नोटीसच्या अटींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यास किंवा स्वतःची ओळख सांगण्यास तयार नसल्यास, पोलीस अधिकारी, या संदर्भात सक्षम न्यायालयाने पारित झालेले केलेल्या आदेशांच्या अधीन राहून, नोटीसमध्ये नमूद केलेल्या गुन्ह्यासाठी त्याला करता येईल."

उक्त तरतुदीचे स्पष्टीकरण देताना असा निर्णय देण्यात आला आहे .

९.... उपरोक्त तरतुदी हे स्पष्ट करतात की कलम ४१ (१) फौ. प्र. सं. अंतर्गत एखाद्या

व्यक्तीला अटक करणे आवश्यक नसलेल्या सर्व प्रकरणांमध्ये पोलीस अधिकाऱ्याने आरोपीला विनिर्दिष्ट ठिकाणी आणि वेळी त्याच्यासमोर हजर राहण्याचे निर्देश देणारी नोटीस बजावणे आवश्यक आहे. कायद्याने अशा आरोपीला पोलिस अधिकाऱ्या समोर हजर राहणे बंधनकारक केले आहे आणि पुढे असे आदेश दिले आहेत की जर अशा आरोपीने नोटीसच्या अटींचे पालन केले तर त्याला अटक केली जाणार नाही, परंतु पोलीस अधिकाऱ्यांच्या मते अटक आवश्यक आहे तर अटकेचे कारण नोंदविल्याशिवाय अटक करता येणार नाही . या टप्प्यावर देखील, कलम ४१ फौ.प्र.सं. अंतर्गत गृहीत धरलेल्या अटकेच्या पूर्व अटींचे पालन करावे लागेल आणि दंडाधिकाऱ्यांकडून उपरोक्त नमूद तशाच छाननीला सामोरे जावे लागेल."

न्यायालयाने पुढे असे म्हटले आहे कीः-

"१०. आमचे असे मत आहे की जो पोलिस अधिकाऱ्याला दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय आणि वॉरंटशिवाय आरोपीला अटक करण्यास अधिकृत करणाऱ्या कलम ४१ फौ.प्र.सं. च्या तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी केली गेली, तर पोलीस अधिकाऱ्यांनी हेतुपुरस्सर किंवा अनिच्छेने केलेली चूक मागे घेतली जाईल आणि अटकपूर्व जामीन मंजूर करण्यासाठी न्यायालयात येणाऱ्या प्रकरणांची संख्या लक्षणीयरीत्या कमी होईल. आम्ही यावर जोर देऊ इच्छितो की कलम ४१ फौ.प्र.सं. मध्ये समाविष्ट असलेली सर्व किंवा बहुतेक कारणे केस डायरीमध्ये अटक करण्यासाठी यांत्रिकरित्या पुनरुत्पादित करण्याची जी प्रथा आहे ती परावृत्त आणि बंद केली जावी यावर आम्ही भर देऊ इच्छितो."

या प्रकरणात जारी केलेले निर्देश नोंद घेण्यासारखे आहेतः-

"११. पोलीस अधिकाऱ्याने आरोपीला विनाकारण अटक करू नये आणि दंडाधिकाऱ्याने सदर अटक सहजपणे आणि यांत्रिकपणे अधिकृत करू नये हे सुनिश्चित करणे हा या निकालातील आमचा प्रयत्न आहे. आम्ही वर जे निरीक्षण केले आहे ते सुनिश्चित करण्यासाठी, आम्ही खालील दिशानिर्देश देतोः

११.१. भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८-अ अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यावर कुठलाही विचार न करता अटक न करता कलम ४१ फौ.प्र.सं. प्रमाणे उपरोक्त नमूद केलेल्या निकषांनुसार अटकच्या गरजेबद्दल त्यांचे समाधान करण्याच्या सूचना सर्व राज्य सरकारांनी आपल्या पोलीस अधिकाऱ्यांना द्याव्यात.

११.२. सर्व पोलीस अधिकाऱ्यांना कलम ४१(१) (बी) (ii) अंतर्गत निर्दिष्ट उपकलम असलेली तपासणी यादी पुरवली जाईल.

११.३. पुढील स्थानबद्धतेसाठी दंडाधिकाऱ्यांसमोर आरोपीला पाठवताना/हजर करताना पोलीस अधिकाऱ्याने योग्य प्रकारे भरलेली तपासणी यादी पाठवावी आणि अटकेसाठी आवश्यक असलेली कारणे आणि साहित्य सादर करावे.

११.४. आरोपींच्या स्थानबद्धतेला अधिकृत करताना दंडाधिकाऱ्यांनी पोलीस अधिकाऱ्याने सादर केलेल्या अहवालाचा उपरोक्त अटींनुसार अभ्यास करावा आणि त्याचे समाधान नोंदवल्यानंतरच दंडाधिकारी स्थानबद्धतेला अधिकृत करतील.

११.५. एखाद्या आरोपीला अटक न करण्याचा निर्णय, खटला दाखल केल्याच्या तारखेपासून दोन आठवड्यांच्या आत जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांनी दिलेल्या प्रतीसह न्यायदंडाधिकाऱ्यांकडे पाठवावा, ज्यावर लिखित स्वरूपात करणे नमूद करून दिल्या जाऊ शकतात.

११.६. कलम ४१ फौ.प्र. संदर्भात हजर राहण्याची नोटीस खटला दाखल झाल्याच्या तारखेपासून दोन आठवड्यांच्या आत आरोपीला दिली जावी, जी जिल्हा पोलीस अधीक्षकांद्वारे लेखी स्वरूपात कारणे नमूद करून दिल्या जाऊ शकते;

११.७. उपरोक्त निर्देशांचे पालन करण्यात असमर्थ ठरल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना विभागीय कारवाईसाठी जबाबदार धरण्या व्यतिरिक्त, प्रादेशिक अधिकार क्षेत्र असलेल्या उच्च न्यायालयासमोर केल्या जाणाऱ्या अवमानासाठी सुद्धा ते दंडास पात्र असतील .

११.८. संबंधित न्यायदंडाधिकाऱ्यांनी उपरोक्त कारणे न नोंदवता स्थानबद्धतेला अधिकृत करण्याबद्दल योग्य त्या उच्च न्यायालयाकडून विभागीय कार्यवाहीसाठी पात्र असेल.

२६. वर नमूद केलेला निर्णय, जो समजण्याजोगा आहे, तो विधिमंडळाच्या तरतुदीनुसार आहे. न्यायालयाने प्राधिकाऱ्यांना जारी केलेले निर्देश हे न्यायालयाच्या संवैधानिक अधिकारांच्या योग्य अंमलबजावणीसाठी वैधानिक स्मरणपत्र देण्याच्या स्वरूपाचे आहेत आणि ते त्यांना हवे ते करू शकतात या कल्पनेचा विचार करून त्यांनी सम्राटांसारखे वागू नये. या संदर्भात, आम्ही **जोगिंदर कुमार -विरुद्ध- यू.पी. राज्य आणि इतर**[६] या उताऱ्याचा

फायद्यासाठी संदर्भ घेऊ शकतो.

"२०. ...... एखाद्या व्यक्तीला केवळ त्याच्यावर केलेल्या गुन्ह्याच्या आरोपावरून नियमित पद्धतीने अटक केली जाऊ शकत नाही. नागरिकांच्या घटनात्मक हक्कांच्या संरक्षणाच्या हितासाठी आणि कदाचित त्यांच्या स्वतःच्या हितासाठी, तक्रारीची सत्यता आणि प्रामाणिकपणा आणि त्या व्यक्तीच्या सहअप्रधतेबद्दल वाजवी विश्वास आणि अटक करण्याची गरज या दोन्हींबद्दल काही चौकशीनंतर वाजवी समाधान मिळेपर्यंत अटक केली जाऊ नये, हे पोलीस अधिकाऱ्यासाठी शहाणपणाचे ठरेल. एखाद्या व्यक्तीला त्याचे स्वातंत्र्य नाकारणे ही एक गंभीर बाब आहे. पोलीस आयोगाच्या शिफारशी केवळ वैयक्तिक स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकाराचे घटनात्मक सहसंबंध प्रतिबिंबित करतात. केवळ गुन्ह्यात सहभाग असल्याच्या संशयावरून एखाद्या व्यक्तीला अटक केली जाऊ शकत नाही. अशा प्रकारची अटक आवश्यक आणि योग्य आहे असे काही वाजवी समर्थन अटक करणाऱ्या अधिकाऱ्याच्या मते असले पाहिजे. जघन्य गुन्ह्यांव्यतिरिक्त, एखाद्या पोलिस अधिकाऱ्याने एखाद्या व्यक्तीला पोलीस स्टेशनला हजर राहण्याची आणि परवानगीशिवाय स्टेशन सोडू नये अश्या सूचना दिल्यास अटक टाळली पाहिजे."

२७. पुन्हा, न्यायालयाने, **जोगिंदर कुमार** (उपरोल्लेखित), प्रकरणातील अटकेपूर्वी आणि अटकेनंतरच्या मानवाधिकारांच्या तक्रारींबाबत आपली चिंता व्यक्त करताना असे निरीक्षण नोंदवले की -

" ९. या दिशेने वास्तववादी दृष्टीकोन स्वीकारला पाहिजे. अटकेचा कायदा म्हणजे एकीकडे वैयक्तिक हक्क, स्वातंत्र्य आणि विशेषाधिकार आणि दुसरीकडे वैयक्तिक कर्तव्ये आणि बंधने आणि जबाबदाऱ्या यांचा समतोल साधणे; एकल व्यक्तीचे आणि एकत्रितपणे व्यक्तींचे हक्क, स्वातंत्र्य आणि विशेषाधिकार यांचे वजन आणि समतोल साधणे; काय हवे आहे आणि कुठे महत्त्व आणि भर द्यायचा याचा फक्त निर्णय घेणे; गुन्हेगार किंवा समाज, कायद्याचे उल्लंघन करणारा किंवा कायद्याचे पालन करणारा कोण ? प्रथम हे ठरवणे.

२८. **डी . के. बसू - विरुद्ध - पश्चिम बंगाल राज्य**[७] या मध्ये न्यायालयाने अधिकारांचा संदर्भ घेतल्यानंतर **जोगिंदर कुमार** (उपरोल्लेखित), **निलाबती बेहेरा -विरुद्ध - ओरिसा राज्य आणि इतर**[८] आणि **म.प्र. राज्य -विरुद्ध -श्यामसुंदर त्रिवेदी आणि इतर**[९] या मध्ये न्यायालयाने काही मार्गदर्शक तत्त्वे घातली आहेत आणि ती पुन्हा सादर करणे आम्हाला योग्य वाटते.

(१) अटक आणि अटक करणाऱ्याची चौकशी करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांनी त्यांच्या पदनामांसह अचूक, दृश्यमान आणि स्पष्ट ओळख आणि नावांचे ठसे लावले पाहिजेत. अटक केलेल्या व्यक्तीची चौकशी हाताळणाऱ्या अशा सर्व पोलिस कर्मचाऱ्यांचा तपशील नोंद वहीमध्ये नोंदवला जाणे आवश्यक आहे.

(२) अटक केलेल्या व्यक्तीच्या अटकेची कार्यवाही करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने अटकेच्या वेळी अटकेचा मेमो तयार करावा आणि असा मेमो किमान एक

साक्षीदाराद्वारे साक्षांकित करण्यात यावा, जो एकतर अटक केलेल्या व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्य असेल किंवा ज्या परिसरातून अटक करण्यात आली आहे त्या परिसरातील सन्माननीय व्यक्ती असेल. त्यावर अटक केलेल्या व्यक्तीचे प्रतिहस्ताक्षर आणि अटकेची वेळ आणि तारीख देखील असेल.

(३) ज्या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे किंवा ताब्यात घेण्यात आले आहे आणि पोलीस स्टेशन किंवा चौकशी केंद्रात किंवा इतर कोठडीत ठेवण्यात आले आहे, त्या व्यक्तीला एक मित्र किंवा नातेवाईक किंवा त्याच्या ओळखीची किंवा त्याच्या कल्याणात स्वारस्य असलेल्या अश्या व्यक्तीला शक्य तितक्या लवकर, त्याला अटक करण्यात आली असून विशिष्ट ठिकाणी ताब्यात घेण्यात आले आहे अशी माहिती शक्य तितक्या लवकर कळवण्याचा अधिकार असेल, जर अटकेचा मेमो साक्षांकीत करणाऱ्या व्यक्तीलाच अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचा मित्र किंवा नातेवाईक नसेल तर.

(४) अटकेनंतर ८ ते १२ तासांच्या कालावधीत जिल्ह्यातील विधी सेवा समिती आणि संबंधित भागातील पोलीस ठाण्याच्या माध्यमातून अटक केलेल्या व्यक्तीचा जवळचा मित्र किंवा नातेवाईक जे जिल्ह्याबाहेर किंवा शहराबाहेर राहत असेल त्यांना त्याची अटक करण्याची वेळ, ठिकाण आणि कोठडीची माहिती पोलिसांनी तारसंदेश द्वारे दिली पाहिजे.

(५) अटक केलेल्या व्यक्तीला अटक झाल्यानंतर किंवा ताब्यात घेतल्यानंतर लगेचच त्याच्या अटकेची किंवा नजरकैदेची माहिती कोणाला तरी देता येते या अधिकाराची जाणीव करून दिली गेली पाहिजे.

(६) अटक केलेल्या व्यक्तीच्या अटकेबाबत स्थानबद्धतेच्या ठिकाणच्या रोजनिशीमधे नोंद करणे आवश्यक आहे, ज्यामध्ये अटकेची माहिती देण्यात आलेल्या व्यक्तीच्या जवळच्या मित्राचे नाव आणि अटक केलेला व्यक्ती ज्याच्या ताब्यात आहे त्या पोलिस अधिकाऱ्यांची नावे आणि तपशील देखील उघड केले पाहिजे.

(७) अटक केलेल्या व्यक्तीने, जिथे तो विनंती करतो, त्याच्या अटकेच्या वेळी त्याची तपासणी केली पाहिजे आणि त्याच्या/तिच्या शरीरावर मोठ्या आणि किरकोळ जखमा असल्यास त्या वेळी नोंदवल्या पाहिजेत. "तपासणी मेमो" वर ज्याला अटक करण्यात आलेली आहे त्याची आणि अटक करणारा पोलीस अधिकारी या दोघांचीही स्वाक्षरी असणे आवश्यक आहे आणि त्याची प्रत अटक केलेल्या व्यक्तीला प्रदान करणे आवश्यक आहे.

(८) अटक केलेल्या व्यक्तीची कोठडीत असताना दर ४८ तासांनी संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या आरोग्य सेवा संचालकांनी नियुक्त केलेल्या मान्यताप्राप्त डॉक्टरांच्या पॅनेलमधील प्रशिक्षित डॉक्टरांकडून वैद्यकीय तपासणी केली जावी. आरोग्य सेवा संचालकांनी सर्व तालुके आणि जिल्ह्यांसाठीही अशी समिती तयार

करावी.

(९) वर नमूद केलेल्या अटकेच्या मेमोसह सर्व कागदपत्रांच्या प्रत, इलाका दंडाधिकाऱ्याकडे त्याच्या नोंदींसाठी पाठवाव्या .

(१०) अटक केलेल्या व्यक्तीला चौकशीदरम्यान त्याच्या वकिलाला भेटण्याची परवानगी देण्यात यावी, परंतु संपूर्ण चौकशीदरम्यान नाही.

(११) सर्व जिल्हा आणि राज्य मुख्यालयांमध्ये एक पोलीस नियंत्रण कक्ष उपलब्ध करून देण्यात यावा, जेथे अटक करणाऱ्या अधिकाऱ्याने अटकेबद्दल आणि अटकेतील व्यक्तीच्या कोठडीची माहिती अटक केल्याच्या १२ तासांच्या आत कळवावी आणि पोलीस नियंत्रण कक्षात ती सूचना दर्शनीय फलकावर प्रदर्शित करावी.

२९. **ललिता कुमारी -विरुद्ध- उत्तर प्रदेश सरकार आणि इतर**[१०] या मध्ये घटनापीठाने फौ. प्र. सं. च्या विविध तरतुदींचा संदर्भ देत प्राथमिक चौकशी करण्याच्या मुद्द्याकडे लक्ष वेधले. अखेरीस, न्यायालयाने असे मत व्यक्त केले की प्राथमिक चौकशीची व्याप्ती प्राप्त झालेल्या माहितीची सत्यता किंवा अन्यथा पडताळणी करणे नसून प्राप्त माहिती कोणत्याही दाखलपात्र गुन्ह्याचा खुलासा करते किंवा नाही, केवळ हे शोधण्यासाठी आहे आणि त्यानंतर पुढे असे म्हटले आहे की -

"१२०.६ कोणत्या प्रकारची आणि कोणत्या प्रकरणांमध्ये प्राथमिक चौकशी करायची हे प्रत्येक प्रकरणाच्या वस्तुस्थिती आणि परिस्थिती अवलंबून असेल. ज्या प्रकरणांमध्ये प्राथमिक चौकशी केली जाऊ शकते त्यांची श्रेणी खालीलप्रमाणे आहेः

(अ) वैवाहिक वाद/कौटुंबिक वाद

(ब) व्यावसायिक गुन्हे

(क) वैद्यकीय निष्काळजीपणाची प्रकरणे

(ड) भ्रष्टाचाराची प्रकरणे

(ई) ज्या प्रकरणांमध्ये फौजदारी खटला सुरू करण्यात असामान्य विलंब/हयगय होते, उदाहरणार्थ, विलंब होण्याचे कारण समाधानकारकपणे स्पष्ट केल्याशिवाय प्रकरणाचा अहवाल देण्यात ३ महिन्यांहून अधिक विलंब.

उपरोक्त नमूद केलेली केवळ उदाहरणे आहेत आणि प्राथमिक चौकशीची हमी देऊ शकतील अशा सर्व अटी पूर्ण नाहीत.

३०. वरील गोष्टींवरून हे अगदी स्पष्ट आहे की वैवाहिक/कौटुंबिक वादांमध्ये प्राथमिक चौकशी केली जाऊ शकते असे घटनापीठाने सुचवले आहे.

३१. **राजेश शर्मा** (उपरोल्लेखित) मध्ये, न्यायालयाने **अर्नेश कुमार** (उपरोल्लेखित) आणि **ललिता कुमारी** (उपरोल्लेखित) या प्रकरणातील हुकुमांचा संदर्भ दिला होता आणि असे निरीक्षण नोंदवले होते की :-

"१६. या न्यायालयाचे कार्य कायदे करणे नव्हे तर केवळ कायद्याचा अर्थ लावणे हे आहे. असे करताना नियम निश्चित करणे कधीकधी अपरिहार्य असते यात शंका नाही[११]. न्याय्य आणि उचित प्रक्रिया जीवनाच्या मूलभूत अधिकाराचा भाग असल्याने[१२], दंडात्मक तरतुदीप्रमाणे प्रमाणे अर्थ लावणे आवश्यक आहे जेणेकरून त्याचे कार्य अन्यायकारक किंवा अवास्तव नसेल. कार्यवाही सुरू ठेवणे हे दडपशाहीचे असल्याचे आढळून आल्यास खाजगी स्वरूपाचे प्रशमन करण्यास अयोग्य प्रकरणही रद्दबातल करणे करण्याचा न्यायालयाला आनुषंगिक अधिकार आहे [१३]. कायदेशीर खटला दडपून टाकणे हे सार्वजनिक धोरणाच्या विरुद्ध आहे, खाजगी स्वरूपाच्या गुन्ह्यातील कार्यवाही जाचक असल्याचे आढळल्यास, रद्द करण्याचा अधिकार वापरला जातो.

१७. आम्ही या प्रकरणाच्या पार्श्वभूमीचा विचार केला आहे आणि ३० ऑगस्ट २०१२ रोजी कायदा आयोगाचा २४३ वा अहवाल, याचिकांवरील राज्यसभा समितीचा १४० वा अहवाल (सप्टेंबर २०११) आणि या न्यायालयाचे पूर्वीचे निर्णय देखील विचारात घेतले आहेत. कायद्यात कोणत्या उद्देशासाठी तरतूद करण्यात आली होती याची आम्हाला जाणीव आहे. त्याच वेळी, निष्पापांच्या मानवाधिकारांचे उल्लंघन बाजूला केले जाऊ शकत नाही. या न्यायालयाने अनावश्यक अटक किंवा असंवेदनशील तपासाविरूद्ध काही सुरक्षा उपायांकडे लक्ष वेधले आहे. तरीही ही समस्या मोठ्या प्रमाणात कायम आहे.

१८. या परिस्थितीवर उपाय म्हणून, तपास अधिकारी आणि संबंधित न्यायालयांना संवेदनशील बनवण्याव्यतिरिक्त, न्यायाच्या प्रशासनाच्या मदतीसाठी नागरी समाजाचा सहभाग हे एक पाऊल असू शकते, असे आमचे मत आहे. पक्षांना केवळ त्या उद्देशासाठी उच्च न्यायालयात जाण्याऐवजी, जिथे खरा तोडगा निघाला असेल तिथे कार्यवाही बंद करणे सुलभ करणे देखील आवश्यक आहे."

३२. असे सांगितल्यानंतर, निर्देश जारी करण्यात आले आहेत जे आम्ही वरील परिच्छेद १५ मध्ये पुनरुत्पादित केले आहेत.

३३. उपरोक्त परिच्छेदांचे अवलोकन केल्यावर, आम्हाला असे आढळले आहे की न्यायालयाने न्याय्य प्रक्रिया आणि तरतुदीच्या कार्यक्षमतेचा आधार घेतला आहे जेणेकरून अंमलबजावणीमध्ये कोणताही अन्याय आणि अवास्तवपणा होणार नाही आणि उक्त हेतूसाठी त्याने अर्थ लावण्याच्या मार्गाचा अवलंब केला आहे. मुख्य मुद्दा हा आहे की **राजेश शर्मा** (उपरोल्लेखित) मध्ये प्रकरणातील न्यायालय, अर्थ लावण्याच्या पद्धतीद्वारे, असे निर्देश जारी करू शकले असते का? निर्देशांचा अभ्यास केल्यावर आम्हाला आढळले की न्यायालयाने जिल्हा विधी सेवा समितीद्वारे कुटुंब कल्याण समित्यां स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत आणि समित्यांची कर्तव्ये विहित केली आहेत. आम्हाला आढळल्याप्रमाणे, समित्यांच्या कर्तव्यांची शिफारस आणि त्यासाठीची पुढील कारवाई, संहितेच्या पलीकडे आहे आणि ती संहितेच्या कोणत्याही तरतुदीतून प्रत्यक्षात येत नाही. तरतुदीचे योग्य, न्याय्य, आणि वाजवी कार्य असणे आवश्यक आहे हे नाकारता येत नाही. विधिमंडळाने आपल्या

विवेकबुद्धीने भा. दं. सं. कलम ४९८-अ अंतर्गत हा गुन्हा दखलपात्र आणि अजामीनपात्र केला आहे. चूक तपास संस्थेची आहे जी कधीकधी मनाचा वापर न करता कारवाईत उडी मारते. **अर्नेश कुमार** (उपरोल्लेखित) मध्ये जारी केलेले निर्देश कलम ४१ फौ.प्र.सं. आणि कलम ४१-ए फौ.प्र.सं. मधील तरतुदींशी सुसंगत आहेत. त्याचप्रमाणे, **जोगिंदर कुमार** (उपरोल्लेखित) आणि **डी. के. बसू** (उपरोल्लेखित) मध्ये नमूद केलेली मार्गदर्शक तत्त्वे हे संहितेच्या चौकटीत आहेत आणि तपास संस्थेच्या श्रेणीबद्ध प्रणालीमध्ये अधिकाऱ्यांना देखरेखीचे अधिकार आहेत. तपास संस्थेने सत्तेचा गैरवापर करू नये आणि लोकांना त्यांच्या लहरीनुसार आणि कल्पनेने अटक करू नये, हा यामागचा उद्देश आहे.

३४. **राजेश शर्मा** (उपरोल्लेखित) मध्ये, तिसऱ्या संस्थेचा समावेश आहे ज्याचा संहितेशी काहीही संबंध नाही आणि त्याशिवाय, समित्या अहवाल सुचवण्याचे अधिकार देण्यात आले आहेत जे अयशस्वी झाल्यास अटक केली जाऊ शकत नाही. खटला नोंदवल्यानंतर त्यावर तोडगा काढण्याचे निर्देश ही कायद्याची योग्य अभिव्यक्ती नाही. दंडनीय नसलेली फौजदारी कार्यवाही उच्च न्यायालयाद्वारे कलम ४८२ फौ.प्र.सं. अंतर्गत रद्द केली जाऊ शकते. जेव्हा तोडगा निघतो, तेव्हा दोन्ही पक्ष कलम ४८२ फौ.प्र.सं. अंतर्गत याचिका दाखल करू शकतात आणि याचिकेचा प्रामाणिक विचार करून उच्च न्यायालय ती रद्दबातल करणे शकते. हा अधिकार उच्च न्यायालयाकडे आहे. या संदर्भात, आपण **जियान सिंग** (उपरोल्लेखित) मधील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने दिलेल्या न्यायनिर्णयातील परिच्छेदाचे पुनरुत्पादन करू शकतो. या प्रकरणात असे म्हटले गेले आहे की :-

"६१. ..... अंतर्निहित अधिकार हा कोणत्याही वैधानिक मर्यादेशिवाय व्यापक आहे, परंतु त्याचा वापर अशा अधिकारात अंतर्भूत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार केला पाहिजे म्हणजे.... (१)न्यायाचे उद्दिष्ट साध्य करणे किंवा(२)कोणत्याही न्यायालयाच्या प्रक्रियेचा गैरवापर रोखणे. जेथे गुन्हेगार आणि पीडितेने त्यांचे विवाद मिटवले आहेत अशा कोणत्या प्रकरणांमध्ये फौजदारी कार्यवाही किंवा तक्रार किंवा एफ.आय.आर. रद्द करण्याचा अधिकार वापरला जाऊ शकतो ते प्रत्येक प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितीवर अवलंबून असेल आणि त्याची कोणतीही श्रेणी निर्धारित केली जाणार नाही. तथापि, अशा अधिकाराचा वापर करण्यापूर्वी, उच्च न्यायालयाने गुन्ह्याचे स्वरूप आणि गांभीर्याकडे योग्य लक्ष दिले पाहिजे. मानसिक विकृतीचे जघन्य आणि गंभीर गुन्हे किंवा खून, बलात्कार, दरोडा यासारखे गुन्हे इत्यादी गंभीर आणि घृणास्पद गुन्हे जरी पीडित किंवा पीडितेच्या कुटुंबीयांनी आणि गुन्हेगाराने वाद मिटवला असला तरी त्याला योग्यप्रकारे रद्द केले जाऊ शकत नाही. असे गुन्हे खाजगी स्वरूपाचे नसतात आणि त्यांचा समाजावर गंभीर परिणाम होतो. त्याचप्रमाणे, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा किंवा त्या पदावर काम करताना सरकारी कर्मचाऱ्यांनी केलेल्या गुन्ह्यांसारख्या विशेष कायद्यांतर्गत गुन्ह्यांच्या संदर्भात पीडित आणि गुन्हेगार यांच्यातील कोणतीही तडजोड अशा गुन्ह्यांशी संबंधित फौजदारी दावे रद्द करण्यासाठी कोणत्याही आधारासाठी तरतूद करू शकत नाही. परंतु, विशेषतः व्यावसायिक, आर्थिक, व्यापारी, दिवाणी, भागीदारी किंवा कौटुंबिक वाद जिथे चूक मुळात खाजगी किंवा वैयक्तिक स्वरूपाची असते आणि पक्षकारांनी त्यांचा संपूर्ण वाद मिटवला आहे असे व्यवहार किंवा हुंडा इत्यादीं पासुन उद्भवणारे गुन्हे, रद्द

करण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणात आणि प्रामुख्याने दिवाणी स्वरूपाचे फौजदारी खटले वेगळ्या पायावर उभे राहतात. या श्रेणीतील प्रकरणांमध्ये, उच्च न्यायालय फौजदारी दावे रद्दबातल करु शकते, जर त्याच्या मते, गुन्हेगार आणि पिडीत यांच्यातील तडजोडीमुळे, दोषसिद्धीची शक्यता कमी आणि धूसर असेल आणि फौजदारी खटला सुरू राहिल्यास आरोपीवर मोठा अत्याचार आणि पक्षपात होईल आणि पिडीतेशी पूर्ण आणि संपूर्ण तडजोड करूनही फौजदारी खटला रद्द न केल्याने त्याच्यावर पराकोटीचा अन्याय होईल."

३५. जरी **राजेश शर्मा** (उपरोल्लेखित), **जियान सिंग** च्या (उपरोल्लेखित) प्रकरणांची दखल घेण्यात आली असली तरी ते वेगळ्या पद्धतीने लागू करण्यात आल्याचे दिसते. मुख्य मुद्दा हा आहे की हे निर्देश स्पष्टीकरण प्रक्रियेद्वारे जारी केले जाऊ शकतात का ? या न्यायालयाने मूलभूत अधिकाराच्या पूर्ततेसाठी कायद्याच्या अनुपस्थितीत अशा काही प्रकरणांमध्ये निर्देश दिले आहेत जसे की ल**क्ष्मी कांत पांडे -विरुद्ध- यूनीयन ऑफ इंडिया**[१४], **विशाखा आणि इतर -विरुद्ध- राजस्थान राज्य आणि इतर**[१५] आणि **कॉमन कॉज (एक नोंदणीकृत संस्था) -विरुद्ध- यूनीयन ऑफ इंडिया आणि काही इतर**[१६]. तथ्यात्मक वस्तुस्थितीसंबंधीचा रचनेचा साचा प्राप्त करताना, या क्षेत्रामध्ये वैधानिक तरतुदी आणि निर्णय आहेत आणि म्हणून समितीच्या स्थापनेशी संबंधित निर्देश आणि त्या समितीला अधिकार प्रदान करणे चुकीचे आहे. तथापि, रेड कॉर्नर नोटीस, प्रकरणांचे एकत्रीकरण आणि वादग्रस्त हुंड्याच्या वस्तूंची वसुली स्वतःच जामीन नाकारण्याचे एक कारण असू शकत नाही असे गृहीत धरणे यासंबंधीचे निर्देश वेगळ्या आधारावर उभे राहतील. ते संरक्षणात्मक

स्वरूपाचे असतात आणि संहितेशी विसंगत नोंद करत नाहीत. जेव्हा जामिनासाठीच्या अर्जाची दखल घेतली जाते, तेव्हा योग्य अटी लादाव्या लागतात परंतु वादग्रस्त हुंडा वस्तूंची वसुली हा भा. दं. सं कलम ४९८-अ अंतर्गत जामीन मंजूर करण्यासाठीचा अर्ज नाकारताना स्वतः एक आधार असू शकत नाही. त्या टप्प्यावर याचा विचार केला जाऊ शकत नाही. त्यामुळे, निर्देश क्र. १९ (iv) आणि (v) या मध्ये आम्हाला काहीच चुकीचे आढळून येत नाही. आतापर्यंत निर्देश क्र. १९ (vi) आणि १९ (vii) च्या संदर्भात, ज्या टप्प्यावर सूट मागितली जाते त्यानुसार एकतर कलम २०५ फौ. प्र. सं. किंवा कलम ३१७ फौ. प्र. सं. अंतर्गत अर्ज दाखल करावा लागतो.

३६. आम्ही यापूर्वी सांगितले आहे की **राजेश शर्मा** (उपरोल्लेखित) मध्ये जारी केलेल्या काही निर्देशांमध्ये विधिमंडळाच्या क्षेत्रात प्रवेश करण्याची क्षमता आहे. **सुरेश सेठ -विरुद्ध- आयुक्त, इंदौर महानगरपालिका आणि इतर**[१७] प्रकरणातील त्रिसदस्सीय न्यायाधीशांच्या खंडपीठाने असा निर्णय दिला आहे.

"५. ..... आमच्या मते, हा लोकप्रतिनिधींनी निर्णय घेण्याचा धोरणात्मक विषय आहे आणि न्यायालयाकडून याबाबत कोणतेही निर्देश दिले जाऊ शकत नाहीत. याशिवाय हे न्यायालय कोणत्याही विशिष्ट प्रकारचा कायदा करण्यासाठी विधिमंडळाला कोणतेही निर्देश देऊ शकत नाही. आपल्या घटनात्मक योजनेंतर्गत संसद आणि विधानसभा कायदे बनवण्याच्या सार्वभौम अधिकाराचा वापर करतात आणि कोणतीही बाहेरील शक्ती किंवा प्राधिकरण विशिष्ट कायदा करण्यासाठी निर्देश जारी

करू शकत नाही. सर्वोच्च न्यायालय कर्मचारी कल्याण संघटना -विरुद्ध- यूनीयन ऑफ इंडिया[१८] (एस.सी.सी.परिच्छेद ५१) मध्ये असे म्हटले आहे की कोणतेही न्यायालय एखाद्या विशिष्ट कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी विधिमंडळाला निर्देश देऊ शकत नाही. त्याचप्रमाणे, जेव्हा कार्यकारी अधिकारी विधिमंडळाच्या प्रत्यायोजित अधिकारानुसार अधीनस्थ कायद्याच्या माध्यमातून विधिमंडळाच्या अधिकाराचा वापर करतो, तेव्हा अशा प्रत्यायोजित कार्यकारी अधिकाऱ्याला असा कायदा करण्यास सांगितले जाऊ शकत नाही जो त्याला प्रत्यायोजित विधिमंडळ प्राधिकरणाच्या अंतर्गत करण्याचा अधिकार देण्यात आला आहे........ "

३७. आणखी त्रिसदस्सीय न्यायाधीशांच्या खंडपीठाने **जनगणना आयुक्त आणि इतर -विरुद्ध- व्ही. आर. कृष्णमूर्ती** [१९]या मध्ये **एन. डी. जयाल आणि इतर -विरुद्ध- यूनीयन ऑफ इंडिया आणि** [२०], **रुस्तम कावासजी कूपर -विरुद्ध- यूनीयन ऑफ इंडिया** [२१], **प्रीमियम ग्रॅनाइट्स आणि इतर -विरुद्ध- त. ना. राज्य आणि इतर**[२२], **एम. पी. ऑइल एक्सट्रॅक्शन आणि इतर -विरुद्ध- मध्य प्रदेश राज्य**[२३], **मध्य प्रदेश राज्य -विरुद्ध- नर्मदा बचाओ आंदोलन आणि इतर**[२४] **आणि पंजाब राज्य आणि इतर -विरुद्ध- राम लुभाया बग्गा आणि इतर**[२५] याचा संदर्भ घेतल्या नंतर असे मत व्यक्त केले आहे कि –

"३३. कायद्याच्या वरील घोषणेवरून, हे दिवसाच्या प्रकाशाप्रमाणे स्पष्ट होते की एखादे विशिष्ट सार्वजनिक धोरण शहाणपणाचे आणि स्वीकार्य आहे की नाही किंवा अधिक चांगले धोरण विकसित केले जाऊ शकते की नाही याची चौकशी करणे

न्यायालयांच्या कार्यक्षेत्रात नाही. न्यायालय केवळ तेव्हाच हस्तक्षेप करू शकते जेव्हा तयार केलेले धोरण पूर्णपणे लहरी असेल किंवा कारणांद्वारे सूचित केले जात नसेल किंवा पूर्णपणे अनियंत्रित असेल आणि घटनेच्या अनुच्छेद १४ च्या मूलभूत गरजेचा भंग करणारी असेल. बऱ्याचदा म्हटल्याप्रमाणे, काही बाबींमध्ये मते आणि मतांतरे असू शकतात परंतु न्यायालयाने एखाद्या मतावर अपील अधिकारी म्हणून बसणे अपेक्षित नाही."

३८. उपरोक्त विश्लेषणात कुटुंब कल्याण समितीशी संबंधित निर्देश आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने तिची रचना जाहीर करताना आणि समितीला दिलेला अधिकार अमान्य आहे. त्यामुळे तपास अधिकाऱ्यांनी सावधगिरी बाळगावी आणि **जोगिंदर कुमार** (उपरोल्लेखित) **डी. के. बसू** (उपरोल्लेखित), **ललिता कुमारी** (उपरोल्लेखित) आणि **अर्नेश कुमार** (उपरोल्लेखित) मध्ये नमूद केलेल्या तत्त्वांनुसार मार्गदर्शन करावे, असे निर्देश देणे आम्हाला योग्य वाटते. भा. दं. सं कलम ४९८-अ अंतर्गत गुन्ह्यांच्या प्रकरणांच्या तपासाची जबाबदारी असलेल्या तपास अधिकाऱ्यांना अटकेशी संबंधित या न्यायालयाने नमूद केलेल्या तत्त्वांविषयी कठोर प्रशिक्षण दिले जावे याची खात्री करण्यासाठी प्रत्येक राज्याच्या पोलीस महासंचालकांना निर्देश देणे देखील योग्य ठरेल.

३९. उपरोक्त पूर्वपक्ष लक्षात घेता, परिच्छेद १९(i) मध्ये समाविष्ट असलेले निर्देश संपूर्णतः वैधानिक चौकटीशी सुसंगत नाहीत आणि परिच्छेद १९(ii) मध्ये जारी केलेले निर्देश येथे वर दिलेल्या निर्देशांच्या संयोगाने वाचले जावे.

४०. निर्देश क्र. १९(iii) मध्ये अशा प्रमाणात सुधारणा करण्यात आली आहे की जर तोडगा काढला गेला असेल तर फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत संबंधित पक्ष उच्च न्यायालयात जाऊ शकतात आणि **जियान सिंग** (उपरोल्लेखित) मध्ये नमूद केलेला कायदा लक्षात घेऊन उच्च न्यायालय ते निकाली काढेल .

४१. जिथे निर्देश क्र. १९(iv), १९(v) आणि १९(vi) आणि १९(vii) याबद्दल संबंधित आहे, तेथे आपण परिच्छेद ३५ मध्ये जे सांगितले आहे त्यानुसार नियंत्रित केले जातील.

४२. **राजेश शर्मा** (उपरोल्लेखित) मध्ये जारी केलेल्या निर्देशांमध्ये उपरोक्त बदलांसह, रिट याचिका आणि फौजदारी अपील निकाली काढले जातात. खर्चाबाबत कोणताही आदेश दिला जाणार नाही.

.............भारताचे सरन्यायाधीश
(दीपक मिश्रा)

.........................., न्यायमूर्ति .
(ए. एम. खानविलकर)

.........................., न्यायमूर्ति .
(डॉ. डी. वाय. चंद्रचूड)

नवी दिल्ली;
१४ सप्टेंबर २०१८.

न्यायनिर्णयाची यादी

१) (२००५) ६ एससीसी २८१ : एआयआर एससी ३१००

२) (२००३) ४ एससीसी ६७५ : एआयआर एससी १३८६

३) (१९८९)२ एससीआर ६१२

४) एआयआर २०१७ एस सी ३८६९ : २०१७ (८) एससीएलई ३१३

५) (२०१४) ८ एससीसी २७३

६) (१९९४) ४ एससीसी २६०

७) (१९९७) १ एससीसी ४१६

८) (१९९३) २ एससीसी ७४६

९) (१९९५) ४ एससीसी २६२

१०) (२००४) २ एससीसी १

११) **सहारा इंडिया रिअल इस्टेट कॉर्पोरेशन लिमिटेड -विरुद्ध- सिक्युरिटीस अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया** : (२०१२) १० एससीसी ६०३, परिच्छेद ५२; **एससीबीए -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया** : (१९९८) ४ एससीसी ४०९, परिच्छेद ४७; **युनियन ऑफ इंडिया -विरुद्ध- रघुबीर सिंग (डी) कायदेशीर वारसांद्वारे** : (१९८९) २ एससीसी ७५४ परिच्छेद ७; **दयाराम - विरुद्ध - सुधीर बाथम** (२०१२)१ एस सी सी ३३३

१२) **पंजाब राज्य -विरुद्ध- दलबीर सिंग** : (२०१२) ३ एससीसी ३४६ परिच्छेद ४६, ५२ आणि ८५.

१३) **जियान सिंग -विरुद्ध- पंजाब राज्य** : (२०१२) १० एससीसी ३०३ परिच्छेद ६१.

१४) (१९८४) २ एससीसी २४४

१५) (१९९७) ६ एससीसी २४१

१६) (२०१८) ५ एससीसी १

१७) (२००५) १३ एससीसी २८७

१८)	(१९८९) ४ एससीसी १८७

१९)	(२०१५) २ एससीसी ७९६

२०)	(२००४) ९ एससीसी ३६२

२१)	(१९७०) १ एससीसी २४८

२२)	(१९९४) २ एससीसी ६९१

२३)	(१९९७) ७ एससीसी ५९२

२४)	(२०११) ७ एससीसी ६३९

२५)	(१९९८) ४ एससीसी ११७

अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."